चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१३ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १२/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, भद्रावती, शेंगाव, माजरी, ब्रम्हपुरी, भिसी, चिमुर, मुल, राजुरा, धाबा, कोठारी, विरूर, कोरपना, टेकामांडवा, वरोरा** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१९** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ११ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **२,३८,९५०/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

# चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

## १) पोलीस स्टेशन बल्लारशाह :—

दिनांक **१२/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **बल्लारशाह** अंतर्गत साईबाबा वार्ड बल्लारशाह येथे ०७ आरोपी हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **बल्लारशाह** येथे अप. क्र. **१७६/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,५०,२५०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **बल्लारशाह** पोलीस करीत आहे.

---

## २) पोलीस स्टेशन माजरी :—

दिनांक **१२/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **माजरी** अंतर्गत येथे ०८ आरोपी हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **माजरी** येथे अप. क्र. **४२/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१५,३५०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **माजरी** पोलीस करीत आहे.

---

**३) पोलीस स्टेशन चिमुर :—**

दिनांक **१२/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **चिमुर** अंतर्गत येथे ०४ आरोपी हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगारचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **चिमुर** येथे अप. क्र. **६३/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०४ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **५३,६७०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **चिमुर** पोलीस करीत आहे.

———————————————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# ३० वा रस्ता सुरक्षा सप्ताह समारोप कार्यक्रम पोलीस मुख्यालय येथे संपन्न

१३ फेब्रुवारी २०१९ रोजी मा. डॉ. कुणाल खेमनार, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली व मा. डॉ. श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या उपस्थितीत ३० वा रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप कार्यक्रम पोलीस मुख्यालय, चंद्रपूर येथे पार पडला.

दि. ४ फेब्रुवारी २०१९ रोजी ३० वा रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन मा. ना. श्री. हंसरात अहिर, केंदीय गृह राज्यमंत्री यांच्या हस्ते झाले होते. ४ फेब्रुवारी पासुन रस्ता सुरक्षा अभियानात जनतेमध्ये जनजागृती व्हावी याकरीता जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा, चंद्रपूर व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमाचे आयोतन करण्यात आले होते. दि. ०५ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांच्या रस्ता सुरक्षेवर चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत सुमारे ५०० च्या वर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. चित्रकला स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे चित्र वाहतुक शाखेतील प्रदर्शनीमध्ये लावण्यात आले होते. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी कडुन रस्ता सुरक्षा याविषयावर मॉडेल तयार करण्यात येवुन याद्वारे वाहतुक शाखेतील प्रदर्शनी विद्यार्थ्यांना व नागरिकांना दाखवुन जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. कुणाल खेमनार, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी जिल्हयातील २८ ब्लॅक स्पॉट (अपघात प्रवण क्षेत्रे) शोधुन काढली असुन त्याठिकाणी आपघात होवु नये या करीता उपायोजना चालु असल्याबाबत महिती दिली. भविष्यात अपघाताला बळी पडु नये याकरीता सर्वांनी वाहतुक नियमांचे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी आपल्या भाषणात सर्व नागरिकांना केले.

मा. पोलीस अधीक्षक श्री महेश्वर रेड्डी यांनी उपस्थीतांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले चंद्रपूर जिल्ह्यातील मागील वर्षीच्या तुलनेत अपघातात मृत्युचे प्रमाण ८.५ टक्यांनी कमी झाले असुन भविष्यात आणखी कमी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत आणि सर्व दुचाकी वाहनचालकांनी गाडी चालवितांना हेल्मेटचा वापर करावा असे जिल्हयातील सर्व जनतेला मा. पोलीस अधीक्षक यांनी आवाहन केले.

☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

समारोप कार्यक्रमाचे प्रास्तावीक श्री विश्वांभर शिंदे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर यांनी केले असुन रस्ता सुरक्षा अभियानादरम्यान राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाची उपस्थितांना माहिती दिली. रस्ता सुरक्षेबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गुनवंताचा व सहभागी सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. दि. ४ फेब्रुवारी झालेल्या जनजागृती परेड चे संचालन करणारे परेड कमांडर भवानजी भाई विद्यालयाची कु. मुस्कान खान व शहिद हेमंत करकरे विद्यालयाचा सेकंड कमांडर अनुराग उईके यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ठरित्या परेड करणाऱ्या रफी अहमद किदवाई हास्कुल, चंद्रपूर, शहिद हेमंत करकरे विद्यालय, चंद्रपूर व एफ.ई.एस. गर्लस् हायस्कुल चंद्रपूर यांना अनुक्रमे ट्रॉफी देवुन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री जयवंत चव्हाण, पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा, चंद्रपूर यांनी केले कार्यक्रमात

---

# पोलीस पाटील व पत्रकार यांच्या समयसुचकतेमुळे वयोवृध्द इसमास घरी पोहचविण्यास झाली मोलाची मदत.

पोलीस स्टेशनच्या दैनंदीन कामकाजात व्यस्त असतांना दिनांक १२/०२/२०१९ रोजी माजरी पोलीस स्टेशन प्रभारी श्री. ढाकणे यांना माजरी तालुक्यातील चाल बर्डी येथुन पोलीस पाटील श्री. सचिन झाडे यांचा फोन आला. फोनवर पोलीस पाटील यांनी माहिती दिली की, एक अनोळखी वयोवृध्द व्यक्ती वय अंदाजे ७० वर्ष हे चाल बर्डी येथे सुमारे ४ ते ५ वाजता दरम्यान गावात फिरतांना मिळुन आले आहे. ते आपले नाव लक्ष्मीकांत मलगुडवार रा. चंद्रपुर एवढेच सांगत असुन नक्की कुठे राहतात याबाबत काहीएक सांगत नसुन त्याची प्रकृती सुध्दा नाजुक आहे. अशी माहिती मिळताच पोस्टे प्रभारी श्री ढाकणे यांनी ताबडतोब या प्रकरणावर लक्ष केंद्रीत करीत त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेण्यास सुरवात केली. या प्रकरणाची माहिती पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी यांना देण्यात आली. चालबर्डी येथे मिळालेले श्री. लक्ष्मीकांत यांचा फोटो काढुन सोशल मिडियावर व्हायरल करण्यात आला. त्याचबरोबर इतर मार्गानेसुध्दा माहिती काढण्यास सुरूवात झाली. सोशल मिडियावर फोटो व्हायरल होताच पोलीस स्टेशन रामनगर प्रभारी पोनि. श्री. कोळी यांना या फोटोवरून एका पत्रकार बंधुचा फोन आला. आणि या इसमाबदद्ल त्याला माहिती असल्याचे सांगीतले. श्री. लक्ष्मीकांत यांचे नातेवाईक व घराचा शोध चालु असतांना पोलीस पाटील यांनी माणुसकी धर्म जपत श्री. लक्ष्मीकांत यांना आपल्या घरातील वयोवृध्द इसमासारखी वागणुक देत त्यांना जेवण, पाणी आणि आराम करण्याची सोय करून दिली.

माहिती देणारे पत्रकार बंधु यांनी श्री. लक्ष्मीकांत यांच्या वानखेडे वाडी तुकुम परिसरात राहणाऱ्या मुलीसोबत श्री. ढाकणे यांचा संपर्क करून दिल्याने काही वेळातच श्री. लक्ष्मीकांत यांचे नातेवाईक माजरी येथे येताच ठाणेदार ढाकणे यांनी श्री. लक्ष्मीकांत यांना त्यांच्या नातेवाईकाकडे सुखरूप सुपुर्त केले. श्री. लक्ष्मीकांत हे एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. ही सर्व शोध मोहीम अवघ्या तिन तासातच पार पडली. या शोध मोहिमेच्या श्रेयाचे मानकरी मौजा चालबर्डी येथील पोलीस पाटील, फोनद्वारे माहिती देणारे पत्रकार बंधु आणि पोनि. श्री. कोळी, सपोनि श्री. ढाकणे यांचे सह पोलीस स्टेशनचे कर्मचारी आहेत.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# शुल्लक कारणावरून वाद घालुन फिर्यादीस गंभीर जखमी करणाऱ्या आरोपीस कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन घुग्घुस अंतर्गत जुन्या वादावरून भांडण करून फिर्यादीचा जिव घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींस दिनांक १३/०२/२०१९ रोजी **श्री. जिल्हा न्यायाधीश श्री. बोरकर, चंद्रपुर यांनी शिक्षा** ठोठावली आहे.

दिनांक ०१/०२/२०१५ रोजी यातील फिर्यादी नामे साजीद उर्फ साजु शाबीर शेख, वय २७ रा. अमराई वार्ड घुग्घुस हा आपल्या मित्रासह रात्रो दरम्यान घरी परत जात होता. यातील **आरोपी नामे भोलेनाथ नारायण कामतवार वय २० रा. अमराई वार्ड घुग्घुस** याचे सोबत फिर्यादी याचा १० ते १२ दिवसापुर्वी शुल्लक कारणावरून भांडण झाला होता. या जुन्या वादावरून आरोपीने फिर्यादीस पाहुन त्याचेसह भांडण घालुन डोक्यावर काठीने मारून जिवानिशी ठार करण्याच्या उद्देशाने गंभीर जखमी केले. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन घुग्घुस येथे अप.क्र. २३/२०१५ कलम ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरिक्षक श्री. संतोष जाधव, पोलीस स्टेशन घुग्घुस यांनी पुर्ण करून तपासादरम्यान गुन्हयातील आरोपीस अटक करून तपासाअंती आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक **१३/०२/२०१९** रोजी **आरोपी नामे भोलेनाथ नारायण कामतवार वय २० रा. अमराई वार्ड घुग्घुस यास कलम ३२४ भादंवि मध्ये ०७ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/—रू दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावासाची शिक्षा श्री. जिल्हा न्यायाधीश श्री. बोरकर, चंद्रपुर यांनी ठोठावली आहे. सदर प्रकरणात** सरकार तर्फे **ॲड. श्री. घट्टुवार, सरकारी अभियोक्ता, चंद्रपुर तर कोर्ट पैरवी म्हणुन पोशि. ब्रिजेश निर्मल, पोस्टे घुग्घुस** यांनी काम पाहीले आहे.

---